# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - 413 255, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७०/७१/७२/७३/७४ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: affiliation@sus.ac.in विस्तारित क्र.: १२२




## शैक्षणिक, संशोधन व विकास (संलग्नता विभाग)

### सुधारित परिपत्रक

**वाचा :** पुअहोसोविसो/संलग्नता/२०२१-२२/४८४३, दिनांक २८/०६/२०२२.

संदर्भीय परिपत्रकान्वये प्रस्तुत विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालयांना सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाचे वार्षिक संलग्निकरण शुल्क प्रति वर्षाप्रमाणे दिनांक ३१ जुलै, २०२२ पूर्वी प्रस्तुत विद्यापीठात जमा करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु, कोव्हीड २०१९ च्या प्रादुर्भावामुळे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षाच्या सत्रारंभ व सत्र समाप्तीच्या तारखेत बदल झाल्यामुळे व विद्यार्थ्यांच्या परीक्षा सद्यस्थितीत सुरु असल्यामुळे प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. यामूळे सोबत जोडलेल्या विवरण पत्रातील अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात वार्षिक संलग्निकरण शुल्क जमा करुन घेण्याकरिता तांत्रिक अडचणी येत आहेत. सदर प्रकरणी महाविद्यालय स्तरावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्याकडून वार्षिक संलग्निकरण शुल्क जमा करण्यासंदर्भात तांत्रिक अडचणी येत असल्याचे विद्यापीठ प्रशासनाच्या निदर्शनास आल्याने मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये सोबत जोडलेल्या सुधारित शुल्क तक्त्याप्रमाणे दिनांक १७/०८/२०२२ पर्यंत वार्षिक संलग्निकरण शुल्क जमा करणेसाठी महाविद्यालयांना मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच कला, वाणिज्य, विज्ञान व विधी महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमाचे वार्षिक संलग्निकरण शुल्क प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रमाणात घेण्याऐवजी महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान व विधी या सर्व अभ्यासक्रमांच्या मिळून एकूण मंजूर विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या (Intake Capacity) प्रमाणात घेणेबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये विविध प्राधिकरणाच्या वतीने मा. कुलगुरु महोदयांनी मान्यता दिलेली आहे. तसेच ज्या महाविद्यालयास निरंतर संलग्निकरण मिळालेले आहे अशा महाविद्यालयाने ही (ज्या महाविद्यालयांनी शुल्क जमा केलेले नाही) नियमानूसार वार्षिक संलग्निकरण शुल्क भरणे आवश्यक आहे.

ज्या महाविद्यालयात एम. फिल. / पीएच. डी. संशोधन केंद्र आहे, अशा महाविद्यालयांनी (ज्या महाविद्यालयांनी शुल्क जमा केलेले नाही) नियमित अभ्यासक्रमाचे व संशोधन केंद्राचे वार्षिक संलग्निकरण शुल्क स्वतंत्ररित्या (वेगवेगळ्या) पत्राद्वारेच जमा करावयाचे आहे.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षाचे वार्षिक संलग्निकरण शुल्क विलंब शुल्कासह भरण्याची तरतूद असली तरी सदरचे शुल्क विद्यापीठ कार्यालयात जमा केल्याशिवाय २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांचे पात्रता व परीक्षा अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

(P.T.O.)

**वार्षिक संलग्निकरण शुल्क व संलग्निकरणाच्या नुतीनकरणाचे शुल्क या दोन्ही बाबी स्वतंत्र असल्याने, वार्षिक संलग्निकरण शुल्क भरले तरी आवश्यकतेप्रमाणे संलग्निकरणाच्या नुतनीकरणाचा विहीत नमुन्यात प्रस्ताव व त्यासाठीचे विहित शुल्क भरणे अनिवार्य आहे. तरी सर्व संलग्नित महाविद्यालयांनी दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ पूर्वी उक्तप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी.**

आदेशावरुन/-

(डॉ. सु. कि. पवार)
प्र. कुलसचिव

**जा. क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२२-२३/** 6021
**दिनांक :** - 4 AUG 2022

प्रति,

१) मा. प्राचार्य/प्राचार्या, सर्व संलग्नित महाविद्यालये, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

२) मा. विभागप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

३) परीक्षा व मूल्यमापन विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
४) पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

} आपणास या पत्राची पत्र देवून कळविण्यात येते की, महाविद्यालयाने वार्षिक संलग्निकरण शुल्क जमा केल्याशिवाय पात्रता व परीक्षा अर्ज स्वीकारु नयेत.

५) संशोधन विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## संलग्नता विभाग

### वार्षिक संलग्निकरण शुल्काचा तपशील

| अ.क्र | विद्याशाखा/अभ्यासक्रम | तपशील | | वार्षिक संलग्निकरण शुल्क |
|---|---|---|---|---|
| १ | बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.ए.एल.एल.बी. व एल.एल.बी. अभ्यासक्रम | **महाविद्यालय स्थापनेच्या प्रथम वर्षी** | | ५,०००/- |
| | | **नंतरच्या प्रत्येक वर्षात खालील प्रमाणे** | | |
| | | सर्व अभ्यासक्रमांची मिळून एकूण मंजूर विद्यार्थी प्रवेशक्षमता (Intake Capacity) | ५०० अथवा कमी | १,०००/- |
| | | | ५०१ ते १००० | १,५००/- |
| | | | १००१ ते १५०० | २,५००/- |
| | | | १५०० पेक्षा अधिक | ३,५००/- |
| | कला, वाणिज्य, विज्ञान व विधी महाविद्यालय (पदव्युत्तर). | एम. ए. **(प्रति विषय)** | | २,०००/- |
| | | एम. कॉम. **(प्रति विषय)** | | २,०००/- |
| | | एम. एस्सी. **(प्रति विषय)** | | २,०००/- |
| | | एल. एल. एम. | | ५,०००/- |
| २ | बी. ए. (Civil Services) | एकूण मंजूर विद्यार्थी प्रवेशक्षमता (Intake Capacity) | ५०० अथवा कमी | १,०००/- |
| | | | ५०१ ते १००० | १,५००/- |
| | | | १००१ ते १५०० | २,५००/- |
| | | | १५०० पेक्षा अधिक | ३,५००/- |
| ३ | बी. कॉम. (Marketing) | एकूण मंजूर विद्यार्थी प्रवेशक्षमता (Intake Capacity) | ५०० अथवा कमी | १,०००/- |
| | | | ५०१ ते १००० | १,५००/- |
| | | | १००१ ते १५०० | २,५००/- |
| | | | १५०० पेक्षा अधिक | ३,५००/- |
| ४ | बी. कॉम. (उद्योजकता) | एकूण मंजूर विद्यार्थी प्रवेशक्षमता (Intake Capacity) | ५०० अथवा कमी | १,०००/- |
| | | | ५०१ ते १००० | १,५००/- |
| | | | १००१ ते १५०० | २,५००/- |
| | | | १५०० पेक्षा अधिक | ३,५००/- |
| ५ | बी. व्होक. | महाविद्यालय / अभ्यासक्रम स्थापनेच्या प्रथम वर्षी - रु. ५,०००/- व नंतरच्या प्रत्येक वर्षात प्रति विषय रु. १०००/- | | |
| ६ | एम. व्होक. | महाविद्यालय / अभ्यासक्रम स्थापनेच्या प्रथम वर्षी रु. ५,०००/- व नंतरच्या प्रत्येक वर्षात प्रति विषय रु. २०००/- | | |
| ७ | बी.बी.ए. | | | १५,०००/- |
| ८ | एम.बी.ए. | | | १५,०००/- |
| ९ | डी.बी.एम. | | | १५,०००/- |
| १० | पी. जी.डी.सी.ए. | | | १५,०००/- |
| ११ | बी.सी.ए. | | | १५,०००/- |
| १२ | बी.एस्सी. (ई.सी.एस.) | | | १५,०००/- |
| १३ | बी.फार्मसी | | | १५,०००/- |

| | | |
|---|---|---|
| १४ | बी.एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी) | १५,०००/- |
| १५ | बी.एस्सी. (इंटरप्रिनरशीप) | १५,०००/- |
| १६ | बी. टेक. | ३०,०००/- |
| १७ | बी.आर्किटेक्चर | १५,०००/- |
| १८ | एम.सी.ए. | १५,०००/- |
| १९ | एम. फार्मसी. | १५,०००/- |
| २० | एम. एस्सी. (बायो-टेक्नॉलॉजी) | १५,०००/- |
| २१ | एम. एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) | १५,०००/- |
| २२ | एम. टेक. **(Per Specialization)** | १०,०००/- |
| २३ | एम. एस्सी. (इंटरप्रिनरशिप) | १५,०००/- |
| २४ | एम. एस्सी. (नॅनोटेक्नॉलॉजी) | १५,०००/- |
| २५ | बी.एड. | १५,०००/- |
| २६ | बी.पी.एड. | १५,०००/- |
| २७ | बी.ए.बी.एड. | १५,०००/- |
| २८ | बी. जे. एम. सी. | १५,०००/- |
| २९ | बी. लिब. | १५,०००/- |
| ३० | एम.एड. | १५,०००/- |
| ३१ | एम.पी.एड. | १५,०००/- |
| ३२ | एम.एस.डब्ल्यू. | १५,०००/- |
| ३३ | एम.फिल / पीएच.डी **(प्रति विषय)** | १,५००/- |

- **प्रस्तावित अभ्यासक्रमाची यादी**

| अ.क | विद्याशाखा/अभ्यासक्रम | वार्षिक संलग्निकरण शुल्क |
|---|---|---|
| १ | बी. एस. डब्ल्यू. | १५,०००/- |
| २ | बी. एफ. टी. | १५,०००/- |
| ३ | बी. टेक्स्टाईल. | १५,०००/- |
| ४ | हॉस्पिटॅलिटी स्टडीज | १५,०००/- |
| ५ | हॉटेल मॅनेजमेंट | १५,०००/- |
| ६ | एम. टेक्स्टाईल. | १५,०००/- |
| ७ | एम. लिब. | १५,०००/- |
| ८ | एम. आर्किटेक्चर | १५,०००/- |

१) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चे वार्षिक संलग्निकरण शुल्क भरण्याची अखेरची तारीख १७ ऑगस्ट, २०२२ ही आहे.

दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी वा तत्पूर्वी वार्षिक संलग्निकरण शुल्क न भरल्यास खालील प्रमाणे विलंब शुल्क आकारले जाईल.

अ) दिनांक ३१ ऑगस्ट वा तत्पूर्वी वार्षिक शुल्काच्या १० टक्के.

ब) दिनांक ३० सप्टेंबर वा तत्पूर्वी वार्षिक शुल्काच्या २० टक्के.

क) दिनांक ३१ ऑक्टोंबर वा तत्पूर्वी वार्षिक शुल्काच्या २५ टक्के.

२) जी महाविद्यालये ३१ ऑक्टोंबर २०२२ पूर्वी वार्षिक संलग्निकरण शुल्क भरणार नाहीत. ती महाविद्यालये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार योग्य त्या कारवाईस पात्र समजण्यात येतील.

३) ज्या महाविद्यालयास निरंतर संलग्निकरण मिळाले आहे अशा महाविद्यालयांनी ही नियमानुसार वार्षिक संलग्निकरण शुल्क भरणे आवश्यक आहे.

आदेशावरुन/-

(डॉ. सु. कि. पवार)
प्र. कुलसचिव